Celebrating Cinema
PIFF Pune International Film Festival

कृपया प्रसिद्धीसाठी

१२ फेब्रुवारी २०२५

# २३ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे दि. १३ रोजी सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते उद्‌घाटन !!

# शुभा खोटे, अनुपम खेर, कविता कृष्णमुर्ती यांना ‘पीफ’चे पुरस्कार प्रदान होणार.

‘२३ वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट (पीफ) महोत्सव २०२५’चा उद्‌घाटन सोहळा दि. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी सायं ५.०० वाजता, श्री गणेश कला क्रीडा रंगमंच स्वारगेट, पुणे येथे महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते संपन्न होईल. भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेत्री शुभा खोटे व ज्येष्ठ अभिनेते पद्मभूषण अनुपम खेर यांना ‘पीफ डिस्टींग्वीश ॲवार्ड’, तर ज्येष्ठ गायिका पद्मश्री कविता कृष्णमूर्ती यांना संगीत क्षेत्रातील योगदानासाठी संगीतकार एस. डी. बर्मन पुरस्कार देऊन या सोहळ्यात गौरविण्यात येणार आहे. फिल्मसिटी मुंबईच्या एमडी श्रीमती. स्वाती म्हसे - पाटील या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

पुणे फिल्म फाउंडेशन, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन व दादासाहेब फाळके चित्रनगरी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महोत्सवाचे आयोजन केले जाते. यंदाची थीम ही ‘‘शो मॅन ; राज कपूर’’ जन्मशताब्दी आहे.

यंदा प्रख्यात चर्मवाद्यवादक विजय चव्हाण आणि सहकारी यांच्या वादनाने उद्‌घाटन सोहळ्याची सुरुवात होईल. उद्‌घाटन सोहळ्यानंतर Gloria, Country: Italy, Switzerland, Dir: Margherita Vicario हा उद्‌घाटनाचा चित्रपट (ओपनिंग फिल्म) म्हणून दाखवण्यात येणार आहे.

दि. १३ ते २० फेब्रुवारी या कालावधीत आयोजित या चित्रपट महोत्सवात विविध देशी-विदेशी सुमारे १५० चित्रपट, जागतिक स्पर्धा विभागातील १४ आणि मराठी स्पर्धा विभागातिल ७ चित्रपट दाखीविले जाणार आहेत. यासाठी कॅटलॉग फी रुपये ८०० फक्त आहे. महोत्सवासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया www.piffindia.com या महोत्सवाच्या अधिकृत संकेतस्थळावर सुरू आहे. चित्रपटगृहांवर स्पॉट रजिस्ट्रेशन प्रक्रियाही सुरू आहे.

सेनापती बापट रस्त्यावरील पॅव्हेलियन मॉलमधील पीव्हीआर आयकॉन (६ स्क्रीन), कॅम्प परिसरातील आयनॉक्स (३ स्क्रीन) आणि औंध भागातील वेस्टएंड मॉलमधील सिनेपोलीस चित्रपटगृहात (२ स्क्रीन) या तीन ठिकाणी एकूण ११ स्क्रीनवर चित्रपट दाखविले जाणार आहेत.

प्रवीण प्र. वाळिंबे
माध्यम समन्वयक
९८२२४५४२३४ / ७३८७००२०९७